
दैनिक

# अक्षराज


अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



वन खात्याची बिबट्यांवर कुटुंब नियोजनाची अनोखी मोहीम... पान ❷



'वनस्पतींनाही संवेदना असतात' याची जगाला जाणीव करून देणारे

महान भारतीय भौतिकशास्त्रज्ञ, वनस्पतीशास्त्रज्ञ

सर जगदीशचंद्र बोस

यांना पुण्यतिथी निमित्त

विनम्र अभिवादन

वर्ष : ०५ | अंक : १००, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२३ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# ३०० वर्षांपूर्वी बुडालेल्या जहाजावर सापडला अब्जावधी डॉलरचा खजिना

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२२, कोलंबिया :** कोलंबियाच्या जवळील समुद्रात अब्जावधी डॉलरचा खजिना सापडला आहे. या खजिन्याच्या जगभर चर्चा आहे. स्पॅनिश युद्धनौका 'सॅन जोस' च्या ढिगाऱ्यातून हा खजिना बाहेर काढला आहे, ज्याला 'जहाजांचे होली ग्रेल' म्हटले जाते. तीन शतकांपूर्वी बुडालेल्या या जहाजातून सोने आणि चांदी ची नाणी, चिनी मातीचे कप आणि तोफ मिळाली आहे. कोलंबियाचे राष्ट्राध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनीही हा खजिना पाहिला आहे. हे जहाज सुमारे ३०० वर्षांपूर्वी कॅरिबियन समुद्रात ब्रिटिश नौदलाने बुडवले होते. हे जहाज दक्षिण अमेरिकेतील स्पॅनिश वसाहतींमधून सोने, चांदी आणि इतर सामान घेऊन स्पेनच्या राजासाठी निघाले होते. आजच्या किमतीनुसार या खजिन्याचे मूल्य अब्जावधी डॉलर्समध्ये आहे.

**• जहाजाचा इतिहास !**

ऐतिहासिक दस्तऐवजांनुसार, 'सॅन जोस' फ्लोटा दे तिएरा फिर्मे नावाच्या जहाजांच्या ताफ्याचा भाग होता. हा ताफा १७०७ मध्ये पेरू येथून निघाला होता आणि मोठ्या प्रमाणात शाही माल घेऊन स्पेनकडे जात होता. मात्र, १७०८ मध्ये ब्रिटिश नौदलाशी झालेल्या लढाईनंतर हे जहाज कोलंबियाच्या किनाऱ्याजवळ बुडाले आणि स्पेनला कधीच पोहोचू शकले नाही.



**• खजिन्यासंबंधी कायदेशीर वाद**

या खजिन्यासंबंधी एक मोठा कायदेशीर वादही निर्माण झाला आहे. कोलंबियाई सरकारचा दावा आहे की त्यांनी २०१५ मध्ये आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांच्या मदतीने हे जहाज शोधले. दुसरीकडे, अमेरिकेची एक सागरी कंपनी सी सर्च-आर्माडाचा दावा आहे की त्यांनी १९८० च्या दशकातच हे जहाज शोधले होते. त्यामुळे त्यांनी १० अब्ज डॉलर्स वाटा मिळावा असा दावा केला आहे.

**• सरकारचं म्हणणं काय ?**

SSA चा दावा पर्मनेंट कोर्ट ऑफ आर्बिट्रेशनमध्ये सुरू आहे आणि हे प्रकरण गुंतागुंतीचे बनले आहे. कोलंबियाई सरकारचे म्हणणे आहे की हे अभियान केवळ खजिना काढण्यासाठी नाही, तर एका वैज्ञानिक संशोधन प्रकल्पाचा भाग आहे. त्यांच्या मते, समुद्रातून मिळालेले हे अवशेष १८ व्या शतकातील युरोपच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थिती समजून घेण्यास मदत करू शकतात. कोलंबियाच्या संस्कृती मंत्री यानाई कादामानी फॉनरोडोना यांनी याला देशाच्या इतिहासाशी आणि ओळखीशी जोडलेले 'ऐतिहासिक पाऊल' म्हटले आहे. सरकारनुसार या वस्तू समुद्राच्या तळाशी अंडरवॉटर रोबोट्सच्या मदतीने काढण्यात आल्या आहेत. आता त्यांना एका प्रयोगशाळेत दीर्घकाळ संरक्षण आणि अभ्यासासाठी ठेवले जाईल.

## बुलढाण्यात ZP शाळेच्या मुख्याध्यापकाचा धिंगाणा



**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.२१, बुलढाणा :** ज्ञानाचे मंदिर असलेल्या जिल्हा परिषद शाळेत प्रार्थनेवेळीच प्रभारी मुख्याध्यापक मद्यपान करून तर्राट झाला. त्याने विद्यार्थ्यांसमोर गोंधळ घालत शिक्षकी पेशाला काळिमा फासली. मेहकर तालुक्यातील मोहना बुद्रूक येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत २० नोव्हेंबरला हा धक्कादायक प्रकार घडला. दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी निलंबनाची कारवाई करीत मुख्याध्यापकाची नशा उतरविली.

धम्मसागर कांबळे असे निलंबित मद्यपी शिक्षकाचे नाव आहे. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकाचा त्याच्याकडे प्रभार आहे. या शाळेवर सहा शिक्षक मंजूर आहेत. मात्र, कार्यरत तीनच आहेत. प्राप्त माहितीनुसार, मुख्याध्यापक कांबळे हा शाळेच्या एका वर्गखोलीत दोन वर्षांपासून निवासी राहात होता. त्यामुळे तो सर्रास दारू प्राशन करून येत होता. गुरुवारी तो झिंगाट झाला. तोल जावून पडत जमिनीवर लोळण घेऊ लागला. प्रार्थना सुरू असताना शिक्षकाने विद्यार्थ्यांसमोर अशोभनीय कृत्य केले. या तळीराम शिक्षकाचा व्हिडीओ सर्वत्र व्हायरल झाला आहे.

दारूड्या शिक्षकाने शाळेची गरिमा घालविल्याने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी तडकाफडकी कारवाई केली. त्यांच्या आदेशान्वये मेहकरच्या गटविकास अधिकाऱ्यांनी कांबळे यास निलंबित केले.

**बावनबीरचा मुख्याध्यापकही निलंबित !**

मध्यान्ह भोजनावेळी संग्रामपूर तालुक्यातील बावनबीर येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना वृत्तपत्रावर खिचडी वाटप केल्याची घटना २० नोव्हेंबरला व्हायरल व्हिडीओमुळे उघडकीस आली. विशेष म्हणजे, शाळेत विद्यार्थी भोजन करीत असताना भटक्या कुत्र्यांचा वावरही पाहावयास मिळाला. मुख्याध्यापक नरहरी टिकार यांनी नियम पायदळी तुडविले. या गंभीर बाबींची दखल घेत सीईओ गुलाबराव खरात यांच्या आदेशानुसार संग्रामपूरच्या बीडीओंनी निलंबनाची कारवाई केली.

## सिडकोतर्फे 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' तत्त्वावर ४,५०८ घरांची विक्री

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.२२, नवी मुंबई :** सिडकोच्या इतिहासात प्रथमच प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वावर ४,५०८ घरांची गृहनिर्माण योजना जाहीर करण्यात आली असून शनिवार, दि.२२ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजेपासून योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस सुरुवात होणार आहे. या योजनेंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गट यांकरिता नवी मुंबईतील तळोजा, द्रोणागिरी, घणसोली, खारघर आणि कळंबोली येथील सिडकोच्या गृहसंकुलांतील ४,५०८ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अर्जदारांना प्रथमच स्वतः च्या पसंतीची सदनिका निवडण्याचे स्वातंत्र्य हे या योजनेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

सिडकोच्या सोयी सुविधांनी सुसज्ज गृहसंकुलांतील ४,५०८ सदनिका या योजनेद्वारे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या योजनेकरिता सोडत किंवा लॉटरी नसून आपल्या पसंतीची सदनिका निवडण्याचे स्वातंत्र्य अर्जदारांना आहे. यामुळे त्यांना शब्दशः आपल्या स्वप्नातील घर साकारता येणार आहे. पुन्हा एकदा सर्वसामान्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या व देशातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक असलेल्या नवी मुंबईमध्ये आपले घर घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. याकरिता अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन मी करतो. असे सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सांगितले आहे. सिडकोतर्फे सातत्याने विविध आर्थिक उत्पन्न गटांतील नागरिकांकरिता गृहनिर्माण योजनांद्वारे परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्यात येतात. या योजनेंतर्गत तळोजा, द्रोणागिरी, घणसोली, खारघर आणि कळंबोली येथील सिडकोच्या गृहसंकुलांतील उर्वरित ४,५०८ सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. एकूण ४,५०८ सदनिकांपैकी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता १,११५ तर अल्प उत्पन्न गटाकरिता ३,३९३ सदनिका उपलब्ध आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सदनिकांकरिता प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत रु.२.५० लाख अनुदान उपलब्ध आहे.



सदर योजनेतील सदनिका या तयार (रेडी टू मूव्ह) असून अर्जदारांना त्यांच्या पसंतीची सदनिका निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर सदनिकांची विक्री करण्यात येणार आहे. सदनिकेच्या किंमतीच्या संपूर्ण रकमेचा भरणा केल्यानंतर अर्जदारांना लगेच सदनिकेचा ताबा देण्यात येणार आहे. कागदपत्रांची तपासणी पूर्ण झाल्यानंतर पात्र अर्जदारांना त्यांच्या पसंतीची सदनिका निवडण्याची संधी मिळणार आहे.

या योजनेतील सर्व गृहसंकुले ही नवी मुंबईतील विकसित नोडमध्ये आहेत. या परिसरामध्ये सर्व मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून नजीकच्या अंतरावर असलेल्या या गृहसंकुलांना उपनगरीय रेल्वे, मेट्रो आणि महामार्ग यांद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे.

ऑनलाइन अर्ज नोंदणीकरिता cidcofcfs.cidcoindia.com हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. योजनेचा सविस्तर तपशील जसे, सदनिकेचे क्षेत्रफळ, किंमत इ. देखील सदर संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. ऑनलाइन अर्ज नोंदणी दि.२२ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजेपासून सुरू होणार आहे. दि.२१ डिसेंबर २०२५ पर्यंत नोंदणी केलेल्या पात्र अर्जदारांना दि.२८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून त्यांच्या पसंतीच्या सदनिकेची निवड करता येणार आहे.

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर सदनिकांची विक्री केली जाणार असल्याने अर्जदारांनी उपरोक्त कालावधीमध्ये, लवकरात लवकर अर्ज करून आपल्या घराचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

## २० कोटी रुपयांतून तयार होणार चंद्रपूर विधानसभेतील १०० पाणंद रस्ते

**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.२२, चंद्रपूर :** आ. किशोर जोरगेवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातील १०० पेक्षा अधिक पाणंद रस्त्यांना मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठीची सोय मोठ्या प्रमाणात सुधारेल तसेच शेतीमाल वाहतूक आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याचा मार्ग अधिक सुलभ होणार आहे.



आतापर्यंत ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांना पावसाळ्यात चिखल, पाणथळ आणि वाहतुकीच्या अडचणींमुळे शेतात जाणे कठीण व्हायचे. त्यामुळे शेती उत्पादन खर्च वाढत होता आणि वेळेवर शेतीकामे करण्यास अडथळे येत होते. मंजूर झालेल्या पाणंद रस्त्यांमुळे आता शेतकरी बांधवांचा श्रम व वेळ दोन्ही वाचणार असून पीक उत्पादन बाजारात नेण्याचे मार्गही सुकर होणार आहेत. या मंजुरीने ग्रामीण जनतेत मोठा आनंद व्यक्त करण्यात येत आहे. या निर्णयाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रोजगार हमी मंत्री भरतशेठ गोगावले यांचे आ. किशोर जोरगेवार यांनी आभार व्यक्त केले आहेत. चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातील गावोगाव रस्ताविकासाचा प्रश्न जलद गतीने मार्गी लागत असून ग्रामीण भागात सर्वांगीण प्रगतीचा नवा अध्याय सुरू झाला आहे. या मंजूर पाणंद रस्त्यांच्या कामाला लवकरच सुरुवात होणार असून प्रत्येक गावापर्यंत विकास पोहोचवण्याचा दृढ संकल्प यामधून दिसून येतो. चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दिलासा देणारा, विकासाचे नवे दालन उघडणारा हा निर्णय कृषी आणि ग्रामविकासाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

शेतकरी हा आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यांच्या दैनंदिन श्रमांना मदत होणे आणि त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यासाठी सुविधा मिळणे ही सरकारची जबाबदारी आहे. या पाणंद रस्त्यांच्या मंजुरीमुळे ग्रामीण भागातील विकासाला मोठी चालना मिळणार असून शेतकऱ्यांना वास्तविक दिलासा मिळेल. माझ्या मतदारसंघातील प्रत्येक गावापर्यंत विकास पोहोचवण्याचा दृढ संकल्प आम्ही केला आहे आणि त्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील. ही मंजुरी ही फक्त सुरुवात आहे. पुढील काळातही ग्रामीण भागातील रस्ते, पाणी, वीज, आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रात अधिकाधिक विकासकामे होत राहतील, अशी प्रतिक्रिया आ. किशोर जोरगेवार यांनी दिली.

## ताडोबा व्याघ्र प्रकल्प परिसरातील ८०० एकर जागेचे होणार पर्यावरणीय पुनरुज्जीवन




**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.२२, मुंबई :** विदर्भातील विविध विकास कामांबरोबरच तेथील जंगल संपदा राखण्यासाठी व त्याच्या वाढीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नेहमीच आग्रही आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरातील ८०० एकर जागेचा पर्यावरणीय पुनरुज्जीवन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाला झिरोधा कंपनी व रेन मॅटर फाऊंडेशन सामाजिक उत्तरदायित्वातून सहकार्य करणार आहेत.

रिवाईल्डिंग म्हणजे जंगल, गवताळ प्रदेश किंवा जलक्षेत्रात मानवी हस्तक्षेप कमीत कमी ठेवून तेथील नैसर्गिक भूभाग, वन्यजीव आणि जैवविविधतेचे पर्यावरणीय पुनरुज्जीवन करणे होय. या संकल्पनेनुसार ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील ८०० एकर क्षेत्राचे पर्यावरणीय पुनरुज्जीवन करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. महाराष्ट्रातील हा पहिलाच प्रकल्प ताडोबामध्ये राबविण्यात येणार असून यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाबरोबरच फार्मर्स फॉर फॉरेस्ट यांच्या सहकार्याने झिरोधा व रेनमॅटर फाऊंडेशन ही संस्था काम करणार आहे. यासाठी सुमारे १०० कोटी रुपयांच्या झिरोधा रिवाइल्डिंग फंड हा विशेष निधी तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पासंदर्भातील औपचारिक घोषणा लवकरच होणार आहे.

झिरोधा आणि 'रेनमॅटर फाउंडेशन' या संस्थांच्या माध्यमातून पर्यावरणीय व सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. रेनमॅटर फाउंडेशनमार्फत हवामान बदल व पर्यावरणीय ऱ्हास या समस्यांवर कामे करण्यात येतात. यासाठी झिरोधा ही कंपनी आपल्या नफ्यातील १० टक्के निधी सामाजिक उत्तरदायित्व व पर्यावरणीय कामांसाठी राखीव ठेवते. या राखीव निधीतून झिरोझाने संस्थेच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त १०० कोटी रुपये गुंतवणुकीचा 'झिरोधा रीवाइल्डिंग फंड' जाहीर केला आहे. या उपक्रमांतर्गत देशातील पर्यावरणीय दृष्टिकोनातून महत्त्वाच्या परिसरातील निसर्गाचे पुनरुज्जीवन करण्यात येणार आहे. त्यामध्ये देशात विविध ठिकाणी मोनोकल्चर वृक्षलागवडी ऐवजी जैवविविधता टिकवणाऱ्या पद्धतीने निसर्गाचा समतोल राखण्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये विदर्भातील ताडोबा- अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील ८०० एकरच्या प्रकल्पाचा समावेश आहे.

विदर्भातील पर्यावरणाच्या संवर्धनासाठी रिवाइल्डिंग सारखे प्रकल्प उपयुक्त आहे. अशा कामांमध्ये झिरोधा सारख्या कार्पोरेट कंपन्या सहभागी होत असून हा पर्यावरणपूरक उपक्रम केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर देशातील कॉर्पोरेट क्षेत्रासाठीही एक आदर्श ठरणार आहे. या उपक्रमाबद्दल अत्यंत उत्साही आहोत. महाराष्ट्र शासन आणि वन विभागासोबतचे हे सहकार्य फलदायी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.




## खरीखुरी अंमलबजावणी होईल?

नाशिकमध्ये २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. यानिमित्त देशभरातील संत, महंत, भाविक नाशिकला भेट देतील. या दरम्यान पर्यटन व तीर्थक्षेत्र भेटीसाठी लाखो भाविक, पर्यटक, साधुसंत राज्यात भेटी देतील. या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्यात आला. छत्रपती संभाजीनगरसह वेरूळ, पैठण व आपेगाव या क्षेत्रांचा विकास करण्यासाठी आर्थिक तरतूद प्रस्तावित केली आहे. तीनही तीर्थक्षेत्रांचे धार्मिक महत्त्व सर्वश्रुत आहे.

कागदावर मांडलेल्या गोष्टी प्रत्यक्षात साकारण्यासाठी पारदर्शक यंत्रणा कामाला लावावी लागणार आहे. प्रशासनाने याबाबत आराखडा तयार केला आहे. नाशिकमध्ये एक कोटी भाविक कुंभम ेळा कालावधीत येतील असा अंदाज घेऊन कृती आराखडा तयार केला आहे. परिवहन, वाहतूक व्यवस्था, मुलभूत सुविधा, भाविक पर्यटकांची सोय व राहण्याची व्यवस्था, सुरक्षा, ऐतिहासिक स्थळांचे जतन हे विचाराधीन ठेवून सुविधांची निर्मिती करण्याचे प्रस्तावित आहे.

प्रशासनाने प्रस्ताविक केलेला वेरूळ व छत्रपती संभाजीनगरसाठी विकासकामांचा आराखडा ७१२६ कोटी २९ लाख रुपयांचा आहे. पैठण व आपेगाव (ता. पैठण) येथील २५०७ कोटी २२ लाख असा एकूण ९६३३ कोटी ५१ लाख रुपयांचा आराखडा आहे. वाहनतळांसाठी १३० हेक्टर क्षेत्रावर पार्किंग व निवास व्यवस्थेचे नियोजन करण्यात येईल. धुळे –सोलापूर महामार्गालगत दोन ठिकाणी, खुलताबाद रस्ता आणि राज्य महामार्ग ५२ लगत अशी ही स्थळे प्रस्तावित आहेत.

पार्किंग व्यवस्थेबाबत एक वेळ मान्य करता येई;, पण निवासव्यवस्था नेमकी कोणत्या स्वरूपाची करणार ? कापडी तंबू, पत्र्याचे तात्पुरते निवारे मग त्यासाठी वीजव्यवस्था, अंतर्गत रस्ते, स्वच्छतागृहे आदी बाबींची पूर्तता कशी करणार हे विचारात घेणे गरजेचे आहे. यासाठी अन्य ठिकाणी या कामाचा अनुभव घेतलेल्या अधिकाऱ्यांना म ार्गदर्शनासाठी बोलावणे आवश्यक आहे. किंबहुना विकास आराखडा अंमलबजावणीसाठी स्वतंत्र टीम करून त्यांना अभ्यासासाठी पाठविणे, तज्ज्ञांचा सल्ला घेऊनच या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. अन्यथा कोट्यवधी रुपयांच्या प्रस्तावांना मंजुरी दिल्यानंतर थातूरमातूर कामे पूर्ण करून पैसे लाटण्याचे प्रकार आपल्याकडे सर्रास घडतात. त्यात आणखी एका प्रकल्पाची भर पडू नये, ही अपेक्षा.

रस्ता, रुंदीकरण, डांबरीकरण, बसेस, ई–रिक्षा सेवा, राखीव मार्ग, जीपीएस अनुकूल पथदिवे, सिग्नल्स, सूचना फलक यासह अन्य सुविधांची पूर्तता कशी केली जाणार, यावरही प्रशासनाने रोडमॅप सादर केला पाहिजे. याशिवाय पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्राथमिक आरोग्य सुविधा, माहिती केंद्र, तीन लाख लोक राहू शकतील अशा क्षमतेची तंबू शिबिरे, अन्नक्षेत्र उभारणी, सीसीटीव्ही कॅमेर, ड्रोन, तात्पुरत्या पोलिस चौक्यांची उभारणी, हेलिपॅड, वेरूळ लेणी व मंदिर सजावट तसेच प्रकाश योजना, पर्यटकांसाठी ॲप व पोर्टल तयार करणे आदी अनेक उपाययोजना मांडण्यात आल्या आहेत.

प्रकल्प अहवालात नुसते सुविधांच्या नावांचे रकाने भरून चालणार नाही. दोन वर्षे टप्पेनिहाय विभागांना निधीचा प्रस्ताव प्रशासनाने आराखड्यात मांडला आहे. त्यात महापालिकेला ३६३२.३२ कोटी, सार्वजनिक बांधकाम विभागाला १३०३ कोटी आणि त्यानंतर पर्यटन विकास महामंडळ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुरातत्त्व विभाग, वन विभाग, अन्न व औषधे विभाग, जिल्हा परिषद यासह अन्य विभागांसाठी उर्वरित तरतूद मांडली आहे.

पैठण व आपेगाव कॉरिडॉरमध्येही पीडब्ल्यूडी ४०० कोटी आणि पैठण नगरपालिकेला ९९६ कोटींची रक्कम प्रस्तावित केली आहे. या प्रकल्पासाठी शहर, जिल्ह्यातील अभ्यासक, निवृत्त अधिकाऱ्यांची एक समिती जिल्हा प्रशासनाने नेमली पाहिजे. तिच्या देखरेखीखाली ही कामे झाल्यास त्यात अधिक पारदर्शकता राहील. त्यांच्या म दतीला समांतर तपासणी यंत्रणा कार्यान्वित केली तर राज्यासाठी ते आदर्श मॉडेल ठरेल. मोठ्या प्रकल्पांच्या कामासाठी ते पथदर्शी ठरल्यास निश्चितच निधीचा अधिक चांगल्या प्रकारे विनियोग होईल, यात शंका नाही

# वन खात्याची बिबट्यांवर कुटुंब नियोजनाची अनोखी मोहीम...

गेल्या दोन महिन्यात नाशिक, कोल्हापूर, सांगली, नागपूर आणि पुणे जिल्ह्यातल्या जुन्नर, शिरूर तालुक्यातल्या ग्रामीण भागात बिबट्याच्या मानवावरच्या हल्ल्यांचे वाढते प्रमाण आणि या हल्ल्यात तिघांचे बळी गेल्याच्या घटनांनी दहशत निर्माण केलेल्या बिबट्यावर नियंत्रण आणण्यासाठी आणि सर्वसामान्य जनतेला त्याच्या भीतीतून मुक्त करण्यासाठी वनखात्याने आता बिबट्याच्या कुटुंब नियोजनाची अनोखी मोहीम अंमलात आणण्याचा निर्णय घेतला आहे. वनमंत्री गणेश नाईक यांनी बिबट्याच्या नसबंदीची नवी प्रतिबंधात्मक योजना जाहीर करताना जुन्नर तालुक्यातल्या मादी बिबट्याची – नसबंदी केली जाईल. शंभर ते सव्वाशे बिबट्यांच्या नसबंदीला प्रायोजिक केंद्र सरकारच्या वन्यजीव विभागाची या नसबंदीसाठी परवानगी मि ळाल्याचे आणि राज्याच्या अन्य भागात अशी परवानगी मिळाल्याची मागणी केल्याचे सांगत बिबट्याच्या हल्ल्याने हैराण, भयभीत झालेल्या जनतेला दिलासा देण्याचा केलेला प्रयत्न कितपत यशस्वी ठरतो, याबद्दल ग्रामीण जनतेच्या मनात शंका आहे. जुन्नर तालुक्यातील काही मादी बिबट्यांची वनखात्याकडून नसबंदी केली जाणार पण राज्याच्या विविध भागात मोकाट सुटलेल्या मानवी वस्तीत घुसणाऱ्या, शेळ्या, मेंढ्या आणि माणसावर हल्ले करणाऱ्या

बिबट्यांच्या हल्ल्यापासून कशी मुक्तता होणार याचे उत्तर काही मिळत नाही. महाराष्ट्रातल्या बिबट्यांची संख्या ४ हजाराच्या वर असल्याचे वनखाते सांगते.

जुन्नर तालुक्यातील बिबट्यांची नसबंदी केली तर त्याच परिसरातील अन्य बिबटे या परिसरात येणार नाहीत, याची खात्री वनखातेही देऊ शकत नाही. बिबट्यांचा उपद्रव वाढला त्या परिसरातल्या बिबट्यांची नसबंदी झाली तरी राज्याच्या अन्य भागात नागरी वस्त्यात दिवसा आणि रात्री घुसणाऱ्या बिबट्यांना रोखायचे कसे यावरचाही नामी उपाय गणेश नाईक सांगतात. जंगलातल्या ससे, कोल्हे अशा प्राण्यांची संख्या कमी झाल्यामुळे भक्ष्यांच्या शोधासाठी बिबटे परिसरातल्या गावात घुसतात. गाई, म्हशी, बकरी व कुत्र्यांवर हल्ले करतात. माणसांवरही हल्ले करतात. जंगलातील अन्नटंचाई दूर करण्यासाठी जंगलात शेळ्या, मेंढ्या, बोकड, कोंबड्या सोडायच्या म्हणजे बिबटे नागरी वस्तीत येणार नाहीत, असे त्यांना आणि वनखात्याला वाटते. बिबट्यांचा वावर असलेल्या राज्यातल्या विविध भागात बिबट्यांसाठी दररोज कोंबडी, बकरी, सोडायची ही कल्पनाच भंपकपणाची आहे तर म ाजी मंत्री सुधीर मुनगुंटीवार यांनी सुचविलेली उपाय योजना तर नाईक यांच्यापे–क्षाही भन्नाट आणि चमत्कारीक आहे. जुन्नर तालुक्यात बिबट्यांची संख्या अधिक असल्याने बिबट्या सफारी सुरू करावी. पर्यटनाला चालना द्यावी, असे त्यांनी सुचविले आहे. मुळात जुन्नर, शिरूर तालुक्यातल्या बिबट्यांचे आश्रयस्थान म्हणजे उसाची शेती. या उसाच्या फडात लपलेले बिबटे अचानक शेतात गेलेल्या लोकांवर, प्राण्यांवर हल्ले चढवितात. लोकांना जखमी करतात. काहींचे बळीही जातात. वनखात्याने पिंजरे लावूनही बिबटे सापडत नाहीत. अशा स्थितीत पिंजऱ्यांची संख्या २०० वरून एक हजार केल्याने अधिक संख्येने बिबटे पिंजऱ्यात सापडतील असे वनखात्याला



वाटते. मुळात राज्यातल्या जंगलाची झालेली बेसुमार त ो ड , वृक्षतोडीम ् ु ळ उघडे बोडके झालेले डोंगर, बेकायदा शिकारी यामुळे जंगलातले बिबट्यांचे भक्ष्य संपत गेले आणि भक्ष्यासाठी बिबटे गावात, शहरात घुसायला लागले, हे वास्तव असताना अशी ही जुजबी उपाययोजना केल्याने बिबटे आणि मानवातला संघर्ष संपणारा नाही...!!

**– ह.भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु पो.मासा बेलेवाडी**
**कागल–कोल्हापूर.**

# थंडीत हात–पायाची बोटं सुजतात? 'हे' सोपे उपाय देतील आराम


हिवाळ्यात खूप थंडी पडल्यावर पायांची आणि हातांची बोटे लाल होणे, दुखणे आणि सूज येणे ही अनेक लोकांमध्ये दिसणारी सामान्य समस्या आहे.

हवामान खूप थंड झाल्यावर रक्तवाहिन्या आकुंचतात आणि अचानक गरम झाल्यावर त्या पटकन विस्तारतात, त्यामुळे त्वचेत द्रव साचतो आणि सूज व वेदना निर्माण होतात.

हवामान खूप थंड झाल्यावर रक्तवाहिन्या आकुंचतात आणि अचानक गरम झाल्यावर त्या पटकन विस्तारतात, त्यामुळे त्वचेत द्रव साचतो आणि सूज व वेदना निर्माण होतात.

सतत अनवाणी चालणे, पाय थेट थंड जमिनीस संपर्कात येणे किंवा दीर्घकाळ थंडीत राहणे यामुळे ही समस्या आणखी वाढते.

सतत अनवाणी चालणे, पाय थेट थंड जमिनीस संपर्कात येणे किंवा दीर्घकाळ थंडीत राहणे यामुळे



ही समस्या आणखी वाढते.

थंडीपासून हात–पायांचे संरक्षण करण्यासाठी बंद, मऊ आणि आरामदायी चप्पले घालणे अत्यंत गरजेचे आहे, कारण त्यामुळे बोटे थेट थंडीपासून सुरक्षित राहतात.

थंडीपासून हात–पायांचे संरक्षण करण्यासाठी बंद, मऊ आणि आरामदायी चप्पले घालणे अत्यंत गरजेचे आहे, कारण त्यामुळे बोटे थेट थंडीपासून सुरक्षित राहतात.

अत्यंत थंड पाण्यात भांडी धुणे किंवा कपडे धुणे यामुळे सूज वाढू शकते, त्यामुळे शक्य असल्यास नेहमी कोमट किंवा किंचित उबदार पाणी वापरावे. अत्यंत थंड पाण्यात भांडी धुणे किंवा कपडे धुणे यामुळे सूज वाढू शकते, त्यामुळे शक्य असल्यास नेहमी कोमट किंवा किंचित उबदार पाणी वापरावे.

दररोज बदाम किंवा ऑलिव्ह ऑइलने हलक्या हाताने हात पायांना मालिश केल्याने रक्ताभिसरण सुधारते, त्वचा मऊ राहते आणि सूज येण्याची शक्यता कमी होते.

दररोज बदाम किंवा ऑलिव्ह ऑइलने हलक्या हाताने हात पायांना मालिश केल्याने रक्ताभिसरण सुधारते, त्वचा मऊ राहते आणि सूज येण्याची शक्यता कमी होते.

बाहेरून थंड झालेले हात आणि पाय लगेच गरम करू नका, कारण अचानक उब दिल्याने सूज आणि वेदना वाढू शकतात त्याऐवजी ब्लँकेट, मोजे किंवा हळूहळू उब देणाऱ्या इतर उपायांचा वापर करून हळूहळू गरम करणे अधिक सुरक्षित आणि आरामदायक असते. बाहेरून थंड झालेले हात आणि पाय लगेच गरम करू नका, कारण अचानक उब दिल्याने सूज आणि वेदना वाढू शकतात. त्याऐवजी ब्लँकेट, मोजे किंवा हळूहळू उब देणाऱ्या इतर उपायांचा वापर करून हळूहळू गरम करणे अधिक सुरक्षित आणि आरामदायक असते.

शरीर आतून उबदार राहण्यासाठी काजू, हिरव्या भाज्या, संपूर्ण धान्य, हंगामी फळे आणि भरपूर पाणी पिणे फायदेशीर ठरते, ज्यामुळे सूज आणि वेदना दोन्ही कमी होतात.

शरीर आतून उबदार राहण्यासाठी काजू, हिरव्या भाज्या, संपूर्ण धान्य, हंगामी फळे आणि भरपूर पाणी पिणे फायदेशीर ठरते, ज्यामुळे सूज आणि वेदना दोन्ही कमी होतात.

## टिकाकार..

उभी इमारत पाडा
एकचं एक अजेंडा
खणून काढा माती
बदलण्यासाठीझेंडा

फांद्याही तोडा मोडा
झाडालाकरावे भुंडा
पोचेना हात मुळाला
खोलवर गेलीतं धुंडा

इलाज नाही रोगावर
गळ्यांत बांधला गंडा
लपविण्यासाठी तोटा
लोकांना घालतो गंडा

कसे ते श्रीमंतझालेत
पुरलायं कुठे का हंडा
खाकेत घेऊ कळसा
चला गावोगावी हिंडा

उसळली गर्दी तिकडे
दुकानी मामला थंडा
समानता हरवून गेली
कारणमिळाले रे बंडा

आत्म हत्या करायला
पीळ भरतो दोर खंडा
धाडस मात्र होतनाही
मरणेहीजमेना रे षंडा

गुन्हा माझा कळेचना
दोष दे अवघ्या खंडा
म्हणून होई टिकाकार
माझा मोठा हातखंडा

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**


# थोर शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस !

थोर शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस हे भारताचे पहिले जीवशास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ वथोर शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस

थोर शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस हे भारताचे पहिले जीवशास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ व वनस्पतीशास्त्रज्ञ होते. जगदीशचंद्र बोस यांनी वनस्पतींमध्ये देखील प्राण्यांप्रमाणे संवेदना असतात हे हे प्रयोगाद्वारे सिद्ध केले. ऊन, पाऊस, थंडी, प्रकाश, ध्वनी यामुळे प्राण्यांप्रमाणे वनस्पतींमध्येही संवेदना निर्माण होतात हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी सेस्कोग्रफ नावाचे यंत्र बनवले. या यंत्राने वनस्पतींची संवेदना दहा हजार पटीने मोठी करून बघता येणे शक्य झाले. सेस्कोग्राफ हे यंत्र वनस्पती शास्त्रसाठी वरदान ठरले.

जगदीशचंद्र बोस यांचा जन्म ३० नोव्हेंबर १८५८ रोजी बंगालमधील ( आताच्या बांगलादेशातील ) मैमनसिंग येथे झाला त्यांचे वडील भगवानसिंग बोस हे सरकारी अधिकारी होते. लहानपणापासूनच जगदीशचंद्र बोस यांना आजूबाजूचा निसर्ग पाहायचे, त्याचे निरीक्षण करण्याची आवड होती. झाडे, पाने – फुले, प्राणी, पक्षी, फुलपाखरे यांचे निरीक्षण करणे हा त्यांचा आवडता छंद होता. जगदीशचंद्र बोस यांचे प्राथमिक शिक्षण गावातल्या शाळेत झाले. कोलकोता येथील सेंट झेवियर्स कॉलेजमधून इंटर मीडियट होऊन, कोलकोता युनिव्हर्सिटी मधून भौतिकशास्त्र व डॉक्टरकीचा अभ्यास करून इंग्लंडच्या ख्राईस्ट चर्च महाविद्यालयातून भौतिकी, रसायन, वनस्पतीशास्त्र व निसर्गशास्त्र यांचा अभ्यास करून भारतात परतले.

१८८५ साली ते भारतात परतल्यावर कोलकोत्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये भौतिकीच्या प्राध्यापक पदावर रुजू झाले. या पदावर रुजू होणारे ते पहिलेच भारतीय असल्यामुळे त्यांना वर्णभेदाला तोंड द्यावे लागले; पण काही वर्षांनंतर त्यांची योग्यता ओळखल्यावर असामान्य शास्त्रज्ञात त्यांची गणना होऊ लागली. १८८५ ते १८९५ या काळात भौतिकशास्त्र शिकवत असताना त्यांनी विद्युत शक्तीवर संशोधन केले. विद्युत चुंबकीय तरांगाचा



शोध लावून त्यांनी बॅटरी बनवली. या शोधाची कीर्ती जगभर पसरली. प्रसिद्ध शास्त्रज्ञ पोईनकर आणि जे. जे. थॉम्पसन यांच्या लेखात या शोधाचा उल्लेख आहे. नेमलाईटच्या मदतीने संदेश पाठवण्यातही त्यांना यश मिळाले. विद्युत शक्तिवरील संशोधनानंतर जगदीशचंद्र बोस वनस्पती शास्त्राकडे वळले. सचेतन आणि अचेतन वस्तूंमधील साम्य आणि भेद यांचा त्यांनी अभ्यास केला. त्यांनी या विषयावर लिहिलेल्या निबंधांना व दिलेल्या व्याख्यानांना सुरवातीला व्यापक मान्यता मिळाली नाही. १९०१ मध्ये त्यांनी लंडनच्या रॉयल सोसायटीला या विषयावर सादर केलेले निबंध स्वीकारण्यात आले नाही. याचे अंशतः कारण म्हणजे त्यांनी या विषयाचे तत्वज्ञानात्मक विवरण केले होते.

तथापि वनस्पतींच्या वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी योजलेल्या वनस्पतींच्या अतिसूक्ष्म हालचालींची नोंद करणाऱ्या अतिशय संवेदनशील स्वयंचलित उपकरणाबद्दल आणि या उपकरणाच्या सहाय्याने त्यांनी विविध उद्दीपनांमुळे होणाऱ्या वनस्पतींतील सूक्ष्म बदलांविषयी सातत्याने जमा केलेल्या माहितीबद्दल त्यांची कीर्ती जगभर पसरली. वनस्पतींच्या वाढीचे दहा हजार पट विवर्धन करू शकणारे सेस्कोग्राफ हे स्वयंचलित यंत्र त्यांनी तयार केले होते. या उपकरणाच्या साहाय्याने बोस यांनी वनस्पतींनाही संवेदनग्रह क्षमता असते, हे प्रयोगाद्वारे सिद्ध करून दाखवले. वनस्पती अन्न ग्रहण करतात, रात्री लवकर झोपतात, सकाळी लवकर उठवतात, मनुष्याप्रमाणे वनस्पतींचाही जन्म, विकास आणि मृत्यू होतो हे जगदीशचंद्र बोस यांनी सिद्ध केले. वनस्पती शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी क्रेस्कोग्राफ, रेझोनंट रेकॉर्डर, एसिलेटिंग रेकॉर्डर, कंपाउंड लेव्हलर, बसलिंग ओपरेट्स , इत्यादी उपकरणे त्यांनी तयार केली. १९२० साली त्यांना रॉयल सोसायटीची फेलोशिप मिळाली. सण १९३६ मध्ये त्यांनी कोलकोत्यात बोस इन्स्टिट्यूट रिसर्च ची स्थापना केली. संस्थेचे मुखपत्रही सुरू केले. जगदीशचंद्र बोस यांनी इरीटेबीलिटी ऑफ प्लॅन्टस्, इलेक्ट्रोफिजिओलॉजी ऑफ प्लॅन्टस. ट्रॉपीक मुव्हमेंट अँड ग्रोथ ऑफ प्लॅन्टस्, द नर्व्हस मेकॅनिजम ऑफ प्लॅन्टस्, प्लॅन्टरिस्पॉन्स १९०६, लाईफ मुव्हमेंट प्लॅन्टस् ( भाग १ ते ४ ) द फिजीऑलॉजी ऑफ फोटोसिंथेसिस, मोटार मेकॅनिजम ऑफ प्लॅन्टस्, रिस्पॉन्सेस इन द लिव्हिंग अँड नॉन लिव्हिंग १९०६ इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. केंब्रिज विद्यापीठाने त्यांना १८९६ मध्ये डी एस सी पदवी दिली. द रॉयल सोसायटीने त्यांना १९२० मध्ये सदस्यत्व बहाल केले. ब्रिटिश सरकारने १९१७ मध्ये त्यांना नाईट हा किताब देऊन त्यांचा गौरव केला. जगदीशचंद्र बोस अत्यंत देशाभिमानी शास्त्रज्ञ होते. भारतीयांनी आपल्या महान सांस्कृतिक परंपरेत वैज्ञानिक संशोधन करून भर घालावी, अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी कोलकोता विद्यापीठात आणि नंतर बोस रिसर्च इस्टिट्यूटमध्ये संशोधनाला अतिशय प्रोत्साहन दिले. जगदीशचंद्र बोस यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी २३ नोव्हेंबर १९३७ रोजी बंगालमधील (आता बिहारमधील) गिरिडी येथे निधन झाले.

जगदीशचंद्र बोस म्हणजे संशोधन, ज्ञाननिष्ठा, प्रयोगशीलता, चिकाटी, दातृत्व व देशभक्तीचा अंतिम शब्द.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## विनापरवानगी मोटारसायकल नेल्याने अल्पवयीनाचा मृत्यू



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२२, विंचूर (नाशिक) :** खडकमाळेगाव (ता. निफाड) येथे घरासमोर उभी असलेली मोटारसायकल विनापरवानगी नेल्याने झालेल्या भीषण अपघातात १७ वर्षीय अल्पवयीन तरुणाचा मृत्यू झाला आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, वाहनांना चावी लावून उघडे ठेवण्याच्या निष्काळजीपणाकडेही लक्ष वेधले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मोटारसायकल मालक दिगंबर बाळू वाघ यांनी घरगुती वापरासाठी बजाज कंपनीची प्लॅटीना मोटारसायकल (एम.एच.१५ ई.वाय.१७१३) घेतली असून ती घराच्या दारात उभी होती. त्यावेळी वाहनाची चावी ही त्यातच ठेवलेली होती. दरम्यान, शेजारी राहणारा तन्मय सोमनाथ जाधव (वय १७) हा कोणालाही न सांगता मोटारसायकल घेऊन लासलगावकडे रवाना झाला. वाहन चालवण्याचा पुरेसा अनुभव नसल्याने खाणगाव रोडवरील वळणावर त्याचा वेग नियंत्रित राहिला नाही. मोटारसायकल घसरून रस्त्याच्या नालीत जाऊन पडल्याने तन्मयच्या डोक्यास, तोंडास, छातीस व कमरेस गंभीर दुखापत झाली. उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पुष्टी केली. अपघातात मोटारसायकलचे ही मोठे नुकसान झाले आहे. याप्रकरणी दिगंबर वाघ यांच्या फिर्यादीवरून लासलगाव पोलिस ठाण्यात मयत युवकाच्या विरोधात गु.रं.नं. २६२/२०२५ भा.दं.वि. कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) तसेच मोटार वाहन कायद्यानुसार कलम १८४, १८१, १ व ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स.पो.नि. भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हवा. उत्तम गोसावी अधिक तपास करीत आहेत. दरम्यान, वाहनांना चावी लावून ठेवू नका, यामुळे जीवितहानी होऊ शकते, असे आवाहन स.पो.नि. भास्करराव शिंदे यांनी केले असून, पालकांनी अल्पवयीनांना वाहन न देण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## स्पर्धा परीक्षा अभ्यासिका सुरु करण्याची आ.देवतळे यांच्याकडे मागणी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** भद्रावती तालुक्यातील घोडपेठ व परिसरातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी स्पर्धा परीक्षा अभ्यासिका जिल्हा वार्षिक योजना नावीन्यपूर्ण विकास योजना अंतर्गत घोडपेठ येथे अभ्यासिका सुरु करण्याबाबतचे निवेदन आमदार करण देवतळे वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्र यांना देण्यात आले. हे निवेदन भारतीय जनता पक्ष भद्रावती ग्रामीणचे तालुका अध्यक्ष शामसुंदर उरकुडे यांच्या नेतृत्वात देण्यात आले. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा उपक्रम स्पर्धा परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य, सुरक्षित व सुविधायुक्त अभ्यासस्थान उपलब्ध व्हावे, तसेच त्यांच्या करिअर घडविण्यास मदत व्हावी, या उद्देशाने ही मागणी करण्यात आली. यामुळे अनेक विद्यार्थ्यांना दर्जेदार अध्ययनाची संधी उपलब्ध होणार असून शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. निवेदन देताना आशिष घोटकर, अरविंद जुमनाके, हेमंत फरकाडे, भूषण नांदे, हेमंत तोडासे, वैभव गोहोकार, आशिष शिरपूरकर आदी उपस्थित होते. या महत्त्वपूर्ण मागणीवर आ. करण देवतळे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले.

## बालकुमार मराठी साहित्य संमेलन स्पर्धेत चिरेखानवाडी शाळेचे यश



**अक्षराज : शरद भगत**

**दि.२२, बारामती :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिरेखाणवाडी शाळेतील इयत्ता चौथी मध्ये शिकणारी विद्यार्थिनी स्वराली सचिन तांबे हिने बालकुमार म राठी साहित्य संमेलन स्पर्धा अंतर्गत सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत जिल्हा स्तरावर तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. तिला वर्गशिक्षिका सौ.शिंदे, मुख्याध्यापक श्री जाधव आणि केंद्रप्रमुख श्री नाझीरकर यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल परिसरातून तिचे कौतुक होत आहे. मुर्टी येथील सजीव संरक्षण जागृती बहुद्देशिक सामाजिक संस्थेचे पुणे जिल्हा संघटक सचिव श्री शरद भगत यांनी स्वराली तांबे हीस वही पेन देऊन सन्मानित केले. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. स्वरालीचे सर्वच स्तरावर कौतुक होत आहे.

## क्रीडा व युवक कल्याण विभागामार्फत ६,७ डिसेंबरला ग्लोबल युथ फेस्टिव्हल २०२५

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२२, मुंबई :** शहरातील तरूणांसाठी ६ आणि ७ डिसेंबर रोजी जिओ वर्ल्ड गार्डन, वांद्रे येथे क्रीडा व युवक कल्याण विभागामार्फत श्रीमद राजचंद्र मिशन यांच्या सहकार्याने ग्लोबल युथ फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांच्या उपस्थितीत हा सोहळा होणार आहे. यामध्ये १० हजार पेक्षा जास्त तरुण मन:शांती, ॲडव्हेंचर, आर्ट्स, कल्चर, संगीत, योग-ध्यान, समाजाभिमुख उपक्रम आणि (स्किल-बिल्डिंग) कौशल्य विकास यांसारख्या अनोख्या उपक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या सहकार्याने, हा देशातील आघाडीचा युवक उत्सव ठरणार आहे. आत्मपरिवर्तनातून सम ाजपरिवर्तन घडवण्यासाठी हा उत्सव तरुणांची चळवळ म्हणून उभी राहील. लंडन आणि पुण्यासारख्या शहरानंतर ग्लोबल यूथ फेस्टिव्हल या वर्षी मुंबई येथे आयोजित करण्यात येत आहे. ग्लोबल यूथ कम्युनिटी ही २० पेक्षा जास्त देशांमध्ये आणि १७० पेक्षा जास्त शहरांमध्ये पसरलेली तरुणांची एक प्रेरणादायी चळवळ आहे. क्रिएटर्स, व्यावसायिक, कलाकार, उद्योजक आणि चेंजमेकर यांनी एकत्रित येऊन ग्लोबल यूथ कमिटी तयार केली आहे. हजारो लोकांना एकत्र आणणारे सायकलथॉनसारखे उपक्रम, ग्रामीण विकासासाठी केलेले अनेक प्रकल्प, आरोग्य, प्राणी-कल्याण, शिक्षण यांसाठी उभारलेले उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ मनोरंजन नसून प्रभाव आणि परिवर्तनाचा उत्सव ठरणार आहे. संगीत किंवा कला अशा एखाद्या विषयापुरते मर्यादित न राहता, ग्लोबल युथ फेस्टिवल हा समग्र अनुभव देणारा उत्सव आहे. महिला सक्षमीकरण, बालशिक्षण, ग्रामीण विकास, प्राणी-कल्याण, पर्यावरण संवर्धन यांसारख्या समाजोपयोगी उपक्रमांचे प्रात्यक्षिक देशातील सर्वात मोठा आऊटडोअर साउंड हीलिंग अनुभव, संगीत, कला, ध्यान, जर्नलिंग, पॉटरी, ड्रम सर्कल अशा मजेशीर पॉप-अप ॲक्टिव्हिटीज यांचा समावेश असणार आहे. अधिक माहितीसाठ्ीूाींहषशीींळीरश्र.ेिऑव.ॲसयेथे भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कृउबा समिती सुख - समृध्दी निर्माण करणारे केंद्र ठरावे - आ.मुनगंटीवार

## सिमेंट रोड व भूमिगत नालीचे लोकार्पण

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** कृषी उत्पन्न बाजार समिती ही ग्रामीण अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान देणारी महत्वपूर्ण संस्था असून, ती केवळ शेतकऱ्यांच्या कृषी मालाच्या खरेदी-विक्रीपूरती मर्यादित राहता कामा नये. शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसोबत त्यांच्या जीवनात सुख-समृध्दी, समाधान आणि सामर्थ्य निर्माण करण्याचे केंद्र म्हणून तिची भूमि का अधिक सक्षम व्हावी, असा ठाम विश्वास माजी मंत्री आमदार सुधीर म ुनगंटीवार यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांना योग्य प्रशिक्षण, दर्जेदार बियाण्यांची उपलब्धता, पुरेशा पतपुरवठ्याची सुविधा, तसेच शेतमाल थेट उद्योगांपर्यंत पोहोचवून अधिक उत्पन्न मिळवून देण्याच्या दिशेने समितीने काम करावे. उत्पादन खर्च कमी करुन शेतऱ्यांच्या



अडचणी सोडविणारे प्रभावी केंद्र म्हणून बाजार समिती विकसित व्हावी, अशी अपेक्षा आ. मुनगंटीवार यांनी यावेळी व्यक्त केली.

चंद्रपूर कृषी उत्पन्न बाजार समिती धान्य बाजारातील सिमेंट रस्ता व भूमि गत नालीचे उद्धाटन मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. यावेळी ते मार्गदर्शन करत होते. मुनगंटीवार म्हणाले, दीर्घकाळ प्रलंबित असलेली ही मागणी पूर्णत्वास येत शेतकऱ्यांसाठी महत्वाची सुविधा उपलब्ध झाली आहे. १ कोटीपेक्षा जास्त निधी खर्च करुन कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि सेवेसाठी येथील सिमेंट रस्त्याचे अधिकृत उद्धाटन व लोकार्पण झाले. चंद्रपूरची कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकऱ्यांच्या हितासाठी महाराष्ट्रामध्ये उत्तम काम करणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यादींमध्ये यावी यासाठी उत्तम कार्य करण्याची आवश्यकता आहे. ही समिती केवळ शेचकऱ्यांच्या कृषी मालाची खरेदी-विक्री करणारे केंद्र न राहता त्यांच्या उत्पन्नवाढीला, तसेच त्यांच्या जीवनात सुख-समृध्दी आणि समाधान निर्माण करण्यासाठी कार्यरत असावी. शेतकऱ्यांना योग्य प्रशिक्षण, उत्कृष्ट बियाणांची उपलब्धता, पतपुरवठा, तसेच शेतमाल उद्योगांपर्यंत पोहोचवून अधिकाधिक उत्पन्न कसे मिळेल यासाठी मदत करणे, उत्पादन खर्च कमी करणे, त्यांच्या समस्यांचे निराकरण करणारे केंद्र व्हावे, असेही ते म्हणाले. पंजाब नॅशनल बँकेच्या माध्यमातून अजयपूर येथे १० एकर परिसरात आधुनिक शेतकरी प्रशिक्षण केंद्र उभारले जात आहे. तसेच मूल येथे कृषी महाविद्यालयाची मंजुरी मिळवून दिली असून, त्या महाविद्यालयाचे उभारणीचे काम ही जलद गतीने सुरु आहे. याशिवाय दरवर्षी तब्बल ५ हजार कोटी रुपयांची कृषी समृध्दी योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहे. बियाण्याच्या कायद्यावरील अशासकीय विधेयक विधानसभेत मांडण्यात येणार असल्याचेही आ. मुनगंटीवार म्हणाले.

# ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनासांठी कडक नियमावली गरजेची...

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२२, सोलापूर :** सद्या साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरू झाल्याने सर्वच मार्गावर ऊसाची वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र क्षमतेपेक्षा अधिक ऊसाची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा धोका वाढला आहे.

सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनाच्या पाठीमागे अथवा बाजूला कोणत्याही उपाययोजना नसल्याने अपघाताचे प्रकार वाढत आहेत. उसाची वाहतूक करत असताना ट्रॅक्टरच्या पाठीमागे कधी एक तर कधी दोन - तीन ट्रॉली असतात. त्यामुळे ऊस वाहतूक करतांना सम ोरून येणाऱ्या गाडीला फक्त ट्रॅक्टर दिसतो. परंतु त्या ट्रॅक्टरच्या पाठीमागे असलेल्या ट्रॉलीवर कोणतेच इंडिकेटर अथवा रिफ्लेक्टर नसल्याने अचानक फसगत होते. बऱ्याचदा वाहनांच्या एकदम जवळ आल्यावर त्या ट्रॉली दिसतात कधीकधी ट्रॅक्टर अचानक बंद कधी पंचर होतो. मग तो ट्रॅक्टर रात्रभर रस्त्यावर किंवा रस्त्याच्या कडेला थांबून ठेवला जातो.

ट्रॅक्टर बंद असल्याने त्यावरती कोणतेच इंडिकेटर नसल्याने अंधारात ट्रॅक्टर रस्त्यावर असलेले दिसत नाही.आणि त्यामुळे बरेच वाहने येऊन त्या बंद असलेल्या ट्रॅक्टरला धडकतात. यामुळे सुद्धा बरेच अपघात घडतात ट्रॅक्टरवर लावलेले साऊंड खूप म



ोठ्याने वाजवले जातात. त्यामुळे ट्रॅक्टरच्या पाठीमागे काय घडते याचा वाहन चालकाला अंदाज येत नाही. उसाची वाहतूक रात्रभर चालूच असते आणि टेप साऊंड मोठमोठ्याने चालूच असल्याने रस्त्याकडील वड्या, वस्त्या व गावातील जातात. तसेच अंधारातून बैलगाडीने ऊस वाहतूक केली जाते. ऊसाने भरलेली बैलगाडी अंधारात जात असताना समोरून आणि पाठीमागून येणाऱ्या वाहनांना बैलगाडी दिसत नाही. कधी, कधी ऊस वाहतूक करणारे वाहनधारक वाहनांचा एकचं बल्ब लावून वाहन चालवतात. त्याम ुळे सुद्धा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी गळीत हंगामच्या काळात अपघात होऊ नयेत. यासाठी आरटीओ, वाहतूक पोलीस प्रशासनाने तातडीने ऊस वाहतूक करणाऱ्या सर्वच वाहनासाठी नियमावली तयार करून काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.

सुरक्षिततेचा अभाव

* अनेक ट्रॅक्टरमध्ये रिफ्लेक्टर लावले नसल्याने रात्रीच्या वेळी अपघात होण्याची शक्यता असते.
* ओव्हरलोडिंग क्षमतेपेक्षा जास्त ऊस वाहतूक केली जाते, ज्यामुळे ट्रॅक्टरचा तोल जातो आणि अपघात होतो. काही ठिकाणी एकाच ट्रॅक्टरला दोन ट्रॉली लावून वाहतूक केली जाते.
* नियमांचे उल्लंघन : अनेक ट्रॅक्टर चालक विनापरवाना वाहन चालवतात आणि वाहतुकीचे नियम पाळत नाहीत.
* रस्त्यांची दुरवस्था खड: काही ठिकाणी रस्त्यांवर खड्डे आहेत किंवा रस्ते कामामुळे खराब झाले आहेत, ज्यामुळे ट्रॅक्टर वाहतूक करणे धोकादायक ठरते.
* अपघाताच्या घटना : रिफ्लेक्टर नसणे आणि ओव्हरलोडिंगमुळे अपघात होऊन जीवितहानी होत आहे.
* विशिष्ट उपक्रम : सुरक्षिततेसाठी काही ठिकाणी पोलिसांनी आणि साखर कारखान्यांनी मिळून ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना रिफ्लेक्टर लावण्याचा उपक्रम राबवला आहे.

# नगरपरिषद निवडणुकीतील उमेदवारांच्या खर्च मार्गदर्शनाबाबत मुदखेड तहसील कार्यालयात बैठक संपन्न



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२२, मुदखेड (नांदेड) :** आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उम ेदवारांनी प्रचार खर्च कसा करावा, कोणते नियम पाळावेत आणि निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या मर्यादांचे पालन कसे करावे याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी दिनांक २१ नोव्हेंबर २०२५ रोजी तहसील कार्यालय मुदखेड येथील सभागृहात महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती.निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली निवडणुकीमध्ये भाग घेतलेल्या सर्व उमेदवार व उमेदवारांची प्रतिनिधी यांना निवडणूक खर्चाचा हिशोब ठेवणे व त्या अनुषंगाने इतर बाबींचे प्रशिक्षण ठेवण्यात आले होते त्यामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नगरपरिषद क्षेत्रांमध्ये चालू असलेले आदर्श आचारसंहितेमध्ये उमेदवारांनी काय करावे काय करू नये. याबाबत माहिती सांगितली. बैठकीत उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा तपशीलवार हिशेब ठेवणे अनिवार्य असल्याचे सांगण्यात आले. प्रचारासाठी लागणारी साधने, प्रचार साहित्य, सभा, रॅली, वाहन आदी सर्व खर्च योग्य पद्धतीने लेखी नोंदीत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच प्रत्येक खर्चाची पावती ठेवणे आणि ती निवडणूक आयोगाकडे निर्धारित वेळेत सादर करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

खर्च विभागाचे प्रमुख दीपक गवलवाड उपकोषकार अधिकारी मुदखेड यांनी उमेदवारांनी त्यांच्या निवडणुकीचा खर्च ऑनलाईन कशी नोंद करावी व कोणती ॲप डाऊनलोड करावे नगराध्यक्ष पदासाठी खर्चाची मर्यादा ७,५०,०००/ एवढी असेल तर नगरसेवकांचा खर्चाची २,५०,०००/ असल्याचे सांगितले सदरील खर्च निवडणुक साठी केलेला खर्च हा उम ेदवाराच्या स्वतंत्र खात्यातून खर्च करावा व १०,०००/ पेक्षा जास्त खर्च असल्यास ऑनलाईन किंवा धनादेशामार्फत करावा निवडणुकीचा खर्च दररोज ऑनलाईन आहेत याद्वारे सादर करून त्यांची प्रिंट कार्यालयात देणे बंधनकारक असल्याचे सांगितले उमेदवारांनी निवडणुकीचा संपूर्ण खर्च निवडणूक संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत समक्ष पावती व नमुना १ ते ४ मध्ये सादर करणे बंधनकारक आहे अन्यथा उमेदवारांवर कारवाई करण्याच्या प्रस्तावास जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे सादर करण्यात येईल

सदरील प्रशिक्षणास मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांनी उमेदवारांना प्रचाराच्या वेळी कोणत्याही नागरिकांवर टीका करू नये दोन सभा घेता वेळी वेळेचे बंधन पाळावे आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करू नये प्रशासनांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे काही संशयास्पद बाब निर्दशनास आल्यास पोलीस प्रशासनास सांगावे असेही पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांनी सांगितले. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणुकीची ईव्हीएम याची सिलिंग दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजी नगर परिषद मुदखेड येथे करण्यात येणार असून सर्वांनी यावेळी उपस्थित रहावे व मतदान करून पहावे असे आवाहन केले उपस्थित उमेदवारांनी उपस्थित केलेल्या शंका प्रश्नांचे उत्तर प्रशासनाने निरासन केले.सदर प्रशिक्षणास निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार आनंद देऊळगावकर साहेब निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार म ारोतराव जगताप, मुख्याधिकारी जगदीश दळवी, उपकोषागार दिपक गवलवाड, पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण, निवडणूक नायब तहसीलदार विजयकुमार पाटे यांच्यासह उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते

# शिवसेना उमेदवाराच्या गाडीने अनेक वाहनांना उडवलं

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२२, अंबरनाथ (ठाणे) :** अंबरनाथ उड्डाणपुलावर शुक्रवारी सायंकाळी भीषण अपघाताची घटना घडली. भरधाव कारच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कारने समोरून येणाऱ्या दोन ते तीन दुचाकींना जोरदार धडक दिली. यानंतर ही कार उलटली. या भीषण अपघातात कार चालक, तसेच दुचाकींवरील तीन जण अशा चौघा जणांचा मृत्यू झाला असून दोघे गंभीर जखमी झाले आहेत. कार चालकाला हृदयविकाराचा धक्का आल्यानंतर हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव



घेत जखमींना रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. या अपघातामुळे उड्डाणपूल, कल्याण, बदला मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत पोलिस अधिक तपास करत होते.

अक्षराज



# शिव पाणंदचे प्रणेते शरद पवळे यांच्याकडून महसूलमंत्र्यांना सन्मानपत्र

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२२, सुपा (अहिल्यानगर) :** नारायणगव्हाण – राळेगणसिद्धी रोडवरून सुरू झालेली 'शिव पाणंद' चळवळ महाराष्ट्रभर पसरली असून आज हजारो शेतरस्ते खुल्या झाल्या आहेत. पारनेर तालुका सामाजिक योगदान आणि राष्ट्रसेवेच्या कार्यासाठी देशात अग्रगण्य ठरलेला असून, याच तालुक्यात पुन्हा 'शिव पाणंद शेतरस्ता चळवळ' उभी राहिली.

राज्यातील विविध तालुका आणि जिल्ह्यांमध्ये चळवळ पोहचली असून हजारो शेतकरी या उपक्रमातून लाभान्वित होत आहेत.राज्यातील अनेक बिटीश कालिन शिवरस्ते खुले होत असुन कोणालाही न सुचलेला विषय एक देशाला आदर्श होत आहे. माझे स्वप्न साकार होत आहे. सरकार, प्रशासन आणि चळवळीचे पदाधिकारी समन्वय साधत शेतकऱ्यांना न्याय देत आहेत. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या मागण्या पूर्ण केल्या आहेत, पण शेवटच्या शेतकऱ्याला दर्जेदार रस्ता देण्यासाठी संघर्ष सुरूच राहणार. महाराष्ट्र शासनाचा ऐतिहासिक निर्णय: शेत रस्ते आणि पाणंद रस्ते १२ फूट रुंदमहायुती सरकारने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली शेत रस्ते आणि पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमण काढणे आणि सीमांकन करणे यासाठी ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

निर्णय दिनांक : २२ मे २०२५

मुख्य वैशिष्ट्ये :

रस्त्याची रुंदी :

१२ फूट नोंदणी :



७/१२ उताऱ्यावर अंमलबजावणीची वेळ :

तहसीलदारांनी सात दिवसांत आदेश पूर्ण करणे बंधनकारक

प्रक्रिया :-

स्थळ पाहणी, पंचनामा आणि जीओ-टॅग छायाचित्रांद्वारे पडताळणीमोफत पोलीस संरक्षण : अतिक्रमण काढण्यासाठी शासनाने दिलेशेत रस्त्यासाठी म रूम दगडासाठी रॉयल्टी माफ ९० दिवसांच्या आत रस्ता

उद्देश :-

शेत-रस्त्यांवरील दीर्घकालीन वाद मि टवणेशेतकऱ्यांसाठी वाहतूक सुलभ करणेआधुनिक शेतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करणेशेतरस्त्यांचे मजबुतीकरण

फायदे :-

**माझ्या 'शिव पाणंद'ला महसुलमंत्र्यांनी न्याय दिला – पवळे**

माझ्या शेतरस्त्यासाठी जो त्रास मला झाला तो माझ्या कोणत्याही शेतकरी भावाला होऊ नये. प्रत्येक गरजवंत शेतकर्याला जोडत तालुका, जिल्हा आणि राज्य पातळीवर प्रशासनापर्यंत न्यायासाठी संघर्ष केला. सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे सरकारने लक्ष दिले आणि महाराष्ट्रात हजारो शेतकऱ्यांची फौज तयार झाली. परिणामी, सरकारने 'शिव पाणंद शेतरस्ता चळवळी'ला दखल दिली आणि अनेक महत्वाचे शासन निर्णय अमलात आले. या यशामुळे आता शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी हा नारा प्रत्यक्षात साकार झाला आहे.

शेतकऱ्यांना होणाऱ्या त्रासापासून सुटकाअतिक्रमण हटवण्याचे काम सुरळीत चालूशेतकरी आपापसातील वादातून फायदा घेऊ शकतीलशेत रस्ते आणि पाणंद रस्ते मोकळे होऊन वाहतूक सुलभ


महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, हा निर्णय आधुनिक शेतीसाठी, शेतकऱ्यांच्या सुविधा वाढवण्यासाठी आणि दीर्घकालीन विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. ६० वर्षांनंतर सरकारने घेतलेला हा क्रांतिकारी निर्णय ऐतिहासिक ठरेल. अखेर, महसूल मंत्री ठरले 'शिव पाणंद शेतरस्ता चळवळी'च्या शेतकरी भावांसाठी यशाचे मानकरी. शेतकऱ्यांसाठी न्याय आणि सुविधा मिळवण्याच्या लढ्यात शिव पाणंद चळवळीला महाराष्ट्र सरकारची पूर्ण साथ मिळाली आहे.

# कौशल्य संपन्न तरुणपिढी उद्याच्या भविष्यासाठी दिशादर्शक - उन्मेष पाटील

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२२, खंडाळा (सातारा) :** एसीजी केअर्स फाउंडेशन, मुंबई पुरस्कृत मिटकॉन फोरम फॉर सोशल डेव्हलपमेंट अंकित कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र शिरवळ येथे कौशल्य विकास प्रशिक्षण प्रमाणपत्र प्रदान सोहळा नुकताच संपन्न झाला. समारंभासाठी प्रमुख अतिथी एसीजी महाव्यवस्थापक उन्मेष पाटील यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत शिरवळचे सरपंच रविराज दुधागावकर तर प्रमुख पाहुणे म्हणून खंडाळा येथील सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय कौशल्य विकास विभागप्रमुख प्रा.अमीर इनामदार होते. प्रारंभी सर्व अतिथीचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक करताना मिटकॉन फोरम संचालक डॉ.गणेश खामगळ म्हणाले,आजच्या औद्योगिक वसाहतींची गरज ओळखून ग्रामीण भागातील तरुणाईचे स्थलांतर रोखण्यासाठी गत १० वर्षांपासून एसीजी केअर्स आणि मिटकॉन फोरम, शिरवळ यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम आणि रोजगार निर्मितीसाठी सातत्यपूर्ण प्रोत्साहन देत आहे. यासाठी ग्रामपंचायत शिरवळ आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांचेही सहकार्य मिळत आहे.या संस्थेचे शेकडो प्रशिक्षित तरुण-तरुणी कौशल्य स्वयंपूर्ण उद्योजक आणि रोजगारसंपन्न होत आहेत याचा अभिमान आहे.

एसीजी महाव्यवस्थापक उन्मेष पाटील म्हणाले-वर्तमानातील कौशल्य संपन्न तरुणपिढी उद्याच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे म्हणून कौशल्य प्रशिक्षण मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्नवादी रहा एसीजी केअर्स आणि मि टकॉन फोरम संस्था होतकरू तरुणाईसोबत आहेत.प्रमुख अतिथी डॉ.शितल कदम म्हणाल्या-मिटकॉन कौशल्य विकास केंद्रातून प्रशिक्षण घेतलेल्या आरोग्य परिचारिका तरुणी अत्यंत नम्र असून त्यांच्यातील सेवभाव रुग्णसेवेला न्याय देत आहे याचा अनुभव गत ५ वर्षांपासून येत आहे. खंडाळा येथील सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयाचे कौशल्य विकास विभागप्रमुख प्रा.अमीर इनामदार-शिरवळ गावाला ऐतिहासिक वारसा असून,रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने स्वराज्य स्थापनेची मुहूर्तमेढ याच भूमितून रोवली गेलीय, शिवकाळात ही कौशल्य विकासाला विशेष महत्व होते. महात्मा गांधींनी खेड्याकडे चला असा मौलिक संदेश देऊन श्रमप्रतिष्ठा



आणि रोजगारक्षम तरुणपिढी निर्मिती व्हावी असा दिव्यदृष्टिकोन मांडला वर्तम ानात ग्रामीण क्षेत्र असणाऱ्या शिरवळ येथील एसीजी केअर्स आणि मिटकॉन फोरम संस्थेच्या माध्यमातून तरुणाई कौशल्य संपन्न होत असून प्रशिक्षण पूर्ण करून स्वयंसिद्ध होत आपलं कौशल्यपूर्ण विश्व निर्माण करत आहे,प्रशिक्षित उम ेदवारांनी दोन्ही संस्थेबद्दलचा आदर आणि बांधिलकी अतूट ठेवावी असे आवाहन केले.कार्यक्रम अध्यक्ष ग्राम पंचायत शिरवळचे सरपंच रविराज दुधगावकर म्हणाले-शिरवळ आणि नजिक असणारी भूमी नायगाव लढवय्यी आणि नावीन्यपूर्ण परिवर्तन घडवणारी आहे. गत २५ वर्षांपूर्वी खेड्याकडून शहराकडे स्थलांतराचे प्रमाण वाढले होते याची तीन प्रमुख कारणे होती,आरोग्य सुविधा,कौशल्य शिक्षण आणि कौशल्य रोजगारसंधी अभाव होते परंतु,आज हे चित्र बदललं आहे ग्राम शिरवळ शहरातील तरुणाईला रोजगार देणारे केंद्र बनले आहे याबद्दल लोकप्रतिनिधी म्हणून मला सार्थ अभिमान आहे. समारंभासाठी एसीजी फार्मा पॅक व्यवस्थापिका गौरी पेंडसे, एसीजी केअर्स फाउंडेशनचे वरिष्ठ व्यवस्थापक चंद्रशेखर वाळके उपस्थिती होती. समारंभाचे सूत्रसंचालन शिरवळ कौशल्य विकास केंद्र प्रमुख सुहास परिहार यांनी केले. यावेळी प्रशिक्षित तरुण-तरुणींना कौशल्य प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले तसेच शिरवळ केंद्राचे पहिले विद्यार्थी व विद्यमान यशस्वी उद्योजक अनुप जंगम यांचा विशेष गौरव करण्यात आला.आभार श्रद्धा पोखरकर यांनी मानले.

# महाराष्ट्र नारीशक्ती समाजरत्न पुरस्कार यमुनाताई शिवतरे यांना प्रदान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, पुणे :** ए.डी.फाउंडेशनचा महाराष्ट्र नारीशक्ती समाज रत्न पुरस्कार २०२५ हा दैदिप्यमान सोहळा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह गंजपेठ, टिंबर मार्केट, स्वारगेट, पुणे येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे आयकर आयुक्त डॉ.नितीन वाघमोडे, मुंबई हायकोर्टाच्या ज्येष्ठ विधीतज्ञ ॲड. डॉ.रंजना खताळ याबरोबरच शिक्षण शिक्षकेतर महामंडळ, महाराष्ट्र राज्य सरचिटणीस प्रा.शिवाजी खांडेकर तसेच डॉ.सारिका महेश शहा आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ए.डी.फाउंडेशनच्या सकारात्मक विधायक व सातत्यपूर्ण वाटचालीबद्दल सर्वच मान्यवरांनी कौतुक केले. तसेच व्यासपीठावरील प्रमुख पाहुणे आयकर आयुक्त डॉ.नितीन वाघमोडे आणि इतर मान्यवरांचे स्वागत आणि प्रास्ताविक फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक गोरड यांनी केले.

शिक्षण, सेवा आणि सुसंस्कृतता यांचा सुंदर संगम म्हणजे यमुनाताई शिवतरे. धनगरवाडी, ता.खंडाळा गावच्या सरपंच यमुनाताई शिवतरे या




उच्च शिक्षित असून त्यांचं सामाजिक कार्य विकासाभिमुख आहे. त्यांनी सरपंच पदाच्या कार्यकाळामध्ये संपूर्ण गाव सुरक्षेच्या अंतर्गत आणण्यासाठी गावामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले.

याशिवाय गावाच्या चारी बाजूंनी असणारे कच्चे रस्ते डांबरीकरण करून गावाचा चेहरामोहरा बदलला. तसेच पिण्याच्या पाण्याचे नियोजन अतिउत्तम केले आहे. याशिवाय त्यांना राष्ट्रीय दर्जाचा आदर्श महिलारत्न पुरस्कार सुद्धा मिळाला आहे. महिलांचं सबलीकरण आणि सक्षमीकरन यावर त्यांचा जास्तीत जास्त भर आहे. तसेच नव्या पिढीला त्या व्यवसायिक मार्गदर्शन सुद्धा देत असतात. त्यांना सेवा, भाव आणि शिस्तीचा आदर्श आहे.

समाज कार्यातून मिळालेली शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि प्रामाणिकपणा यांचे संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वात ठळकपणे दिसून येतात. संयम, संस्कार आणि संवाद यांना तेवढेच महत्त्व असते. हे यमुना अमोल शिवतरे यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे आणि याच त्यांच्या कार्याची दखल घेऊन ए. डी. फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने महाराष्ट्र नारीशक्ती समाज रत्न पुरस्कार २०२५ (आदर्श सरपंच) ने त्यांना सन्मानित करण्यात आले.

पुरस्काराचे स्वरूप मानपत्र, सन्म ानचिन्ह मानाचा फेटा, मेडल असे होते. याबरोबर इतरही पुरस्कार्थी महिलांना कार्यक्रमांमध्ये गौरवण्यात आले. या सोहळ्यासाठी ए. डी. फाउंडेशनचे पदाधिकारी महादेव महानूर, दिलीप वाघमोडे, दादासो गोरड, शरद माने, सागर महानूर, राकेश पांढरे, श्री. शेंडगे, प्रा.विजय जगताप आदींनी परिश्रम घेतले. प्रभावी सूत्रसंचालन म नाली कोकरे यांनी केले. हा पुरस्कार मिळाल्यानंतर यमुना अमोल शिवतरे यांचे सातारा जिल्ह्यातील तसेच खंडाळा तालुक्यातील औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील अनेक म ान्यवरांनी अभिनंदन केले आणि पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# थोडक्यात

## नवीन घराची घरपट्टी थांबवून ग्रामसेवकाची उडवाउडवी...

### संतप्त नागरिकांची निलंबनाची मागणी

**अक्षराज : सुनिल फर्डे**



**दि.२२, शहापूर (ठाणे) :** फुगाले ग्राम पंचायतीच्या कामकाजातील ढिसाळपणा पुन्हा एकदा समोर आला आहे. नवीन घराची घरपट्टी (मालमत्ता कर नोंदणी) देण्यासाठी नागरिकाने केलेल्या वारंवार विनंत्या ग्रामसेवकाने दुर्लक्षित केल्याचा गंभीर आरोप उघड झाला आहे. उडवा-उडवीच्या उत्तरांनी दमवण्यात आल्याची माहिती मिळताच गावात संतापाची लाट उसळली आहे. सदर प्रकरणात ग्रामसेवकाच्या अकार्यक्षमता, जाणूनबुजून विलंब आणि नागरिकांना त्रास देण्याच्या भूमिकेविरोधात संबंधित नागरिकाने तालुका प्रशासनाकडे तक्रार दाखल केली असूनग्रामसेवकाचे तात्काळ निलंबन, चौकशी आणि योग्य ती प्रशासकीय कारवाईकरण्याची मागणी करण्यात आली आहे.स्थानिकांच्या मते, गावात अनेक विकासकामे, परवाने व घरपट्टी नोंदी ग्रामसेवकाकडून विलंबित केल्या जात आहेत. सरकारी सेवकाने सेवा द्यावी त्रास नाही. घरपट्टी रोखून ठेवणे असे मूलभूत काम हा अधिकाराचा गैरवापर असा आरोप ग्रामस्थांनी केला. स्थानिकांनी चेतावणी दिली आहे की योग्य ती कार्यवाही लवकर न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयासमोर तीव्र आंदोलन उभे केले जाईल. ग्रामसेवकाच्या हलगर्जीपणामुळे पेटलेला संताप आता कारवाई करा किंवा आम्ही रस्त्यावर' या पातळीवर पोहोचला असून, प्रशासनाकडून आतुरतेने पुढील निर्णयाची प्रतीक्षा केली जात आहे.

## परराज्यातील बनावट विदेशी मद्यसाठा जप्त; उत्पादन शुल्क विभागाची अवैध मद्यविरोधी कारवाई



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** राज्य उत्पादन शुल्क विभाग, वरोरा निरीक्षक पथकाने येनसा ते सोसायटी (मजरा) जाणाऱ्या रस्त्यावर कारवाई करुन चारचाकी वाहनातून अवैधरित्या वाहतूक होत असलेला परराज्यातील व बनावट विदेशी मद्यसाठा जप्त केला. जप्त मद्य आणि वाहनाची एकूण किंमत अंदाजे ६ लाख ४० हजार इतकी असून तिघांना ताब्यात घेण्यात आले आहे. दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास नागपूर-चंद्रपूर हायवेवर वरोरा तालुक्यात कारवाई करण्यात आली. शॉवरलेट कंपनीच्या ग्रे रंगाच्या चारचाकी वाहनाची तपासणी करण्यात आली असता वाहनाच्या डिक्कीत रॉयल स्टॅग ब्रँडच्या १८० मिलीच्या चॅलेंज ब्रँडच्या मध्यप्रदेश निर्मित ७५० मिलीच्या २४ बॉटली (प्रथम दर्शनी बनावट) असा परराज्यातील व महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधित विदेशी मद्य साठा आढळून आला.

या प्रकरणी मनिष नंदकिशोर जयस्वाल (४८) रा. नागपूर, विशाल शंभू मंडळ (२८) रा. सावनेर, जि. नागपूर, सतीश नामदेव देवकर (३१), वरोरा, जि. चंद्रपूर यांना अटक करण्यात आली असून महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपआयुक्त गणेश पाटील आणि अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.कारवाईत निरीक्षक प्रवीण मोहतकर, दुय्यम निरीक्षक सचिन पोलेवार, प्रमोद रजोते, हर्षराज इंगळे, सागर दिडसे, जवान विलास महाकुलकर (वाहनचालक), तसेच जवान जगदिश मस्के, जितेंद्र आनंद, मंगेश कुयटे, आणि अमोल भोयर यांचा सहभाग होता. सदर प्रकरणाचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक सचिन पोलेवार, राज्य उत्पादन शुल्क, वरोरा हे करीत आहे.

## शाळेजवळ टवाळखोरांचे मद्यपान वाढले; प्रशासनाकडे तक्रार

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.२२, विंचूर (नाशिक) :** विंचूर गावातील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात रात्रीच्या सुमारास मद्यपी व टवाळखोरांची वर्दळ वाढत चालल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. अंधार पडल्यानंतर शाळेच्या आवारात काही व्यक्ती येऊन मद्यपान करत असल्याने परिसर असुरक्षित होत चालला आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित होत असून पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. ग्रामस्थांच्या माहितीनुसार, शाळेच्या आवारात रिकाम्या दारूच्या बाटल्या, ग्लास व प्लास्टिकचे कचरे आढळत आहेत. सकाळी विद्यार्थी शाळेत येताना हा कचरा दिसत असल्याने शाळा व्यवस्थापनही त्रस्त झाले आहे. शाळा म्हणजे शिक्षणाचे पवित्र स्थान इथेच रात्री दारू पिणाऱ्यांचा ठाण मांडणे अत्यंत निंदनीय आहे, अशी प्रतिक्रिया काही पालकांनी दिली. या बाबत ग्रामपंचायत, पोलिस पाटील आणि स्थानिक पोलिस ठाण्याला कळविण्यात आले असून रात्री गस्त वाढविण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. शाळा परिसरात दिवसा व रात्री प्रकाशयोजना, सीसीटीव्ही बसवणे तसेच सुरक्षा उपाययोजना करण्याची गरजही व्यक्त होत आहे. स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी या प्रकारावर तातडीने कारवाई करावी, अन्यथा ग्रामस्थ आंदोलनाचा इशारा देणार असल्याचे सांगितले आहे.

## शहापूरमध्ये आदिवासी विभागाच्या प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२२, शहापूर (ठाणे) :** तीन दिवसीय क्रीडा महोत्सवात ३८ आश्रमशाळांम धील तब्बल २,२८४ विद्यार्थी सहभागी झाले असून, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, हँडबॉल व ॲथलेटिक्ससह तीन वयोगटांमध्ये स्पर्धा खेळवण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून शहापूर उपविभागीय पोलीस अधिकारी मिलिंद शिंदे उपस्थित होते.

तसेच प्रकल्प अधिकारी राजेंद्रकुमार हिवाळे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी दिवाकर काळपांडे, अरविंद जाधव, लेखा निरीक्षक पंढरीनाथ वेखंडे, प्रहार तालुका अध्यक्ष वसंत पानसरे सह एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापूर आश्रम शाळेतील मुख्यध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.